महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**जा.क्र./उमाशि-४०३/११ वी ऑनलाईन २०-२१/पुवि/२०/** 3988
**दिनांक :-** 30 JUN 2020

प्रति,

सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक,
**अनुदानित/विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित/**
**स्वंयअर्थसहाय्यित माध्यमिक शाळा/कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालय, सलग्न**
**इ.११ वी ऑनलाईन पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र (फक्त)**

**विषय:-पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याबाबत**

**संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक-प्रवेश-२०१८/प्र.क्र.३३३/एसडी-२ दि.२३.०६.२०२०.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश यशस्वीरित्या पार पाडण्यात आपणा सर्वांचे अनमोल सहकार्य लाभले याबद्दल हार्दिक अभिनंदन!

नवीन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची प्रवेश प्रक्रिया देखील नवीन शासन निर्णय दि.२३.०६.२०२० नुसार कमीत कमी कालावधीत व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुचना शासन स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत, तथापि लवकरच इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी सुरु होणार आहे, सदर नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या शासन निर्णयाचे वाचन करणे आवश्यक आहे, तसेच कनिष्ठ महाविद्यालयाची इ.११ वी ऑनलाईन नोंदणीसाठी कागदपत्रे, सहपत्रे इ. सर्व आपल्या संग्रही ठेवावे, जेणेकरुन आपणांस लवकरात लवकर नोंदणी करणे शक्य होईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सोबत :- शासन निर्णय दि.२३.०६.२०२० ची प्रत

(मीना शेंडकर)
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
**सहा.शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे-१.
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.पुणे यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या माध्यमिक सलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना उपरोक्त शासन निर्णयप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे.



Scanned with CamScanner

शैक्षणिक वर्ष सन २०२०- २१ पासून इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अधिक सुसूत्रता आणण्याबाबत.

**महराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: - प्रवेश २०१८/प्र. क्र.३३३/एसडी-२**

मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: - २३ जून, २०२०

**वाचा: -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: एचएससी-१०९७/ (१४४४/९७)/ उमाशी-१, दि.२६.०६.१९९७

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: एचएससी-१७०९/ (४४/०९) उमाशी-१, दि.२८.०५.२००९

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: एचएससी-१०९७/ (१४४४/९७) उमाशी-१, दि.०७.०६.२०१०

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: एचएससी-१८११/ (४४१/११) उमाशी-१, दि.१६.०३.२०१२

५) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: - संकीर्ण-१०१३/ प्र. क्र.२३६/ १३/ एसडी-२, दि.०३.०३.२०१४

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: व्यशि-२०१४/ (प्र. क्र.८२/१४)/ एसडी-६, दि.२१.०८.२०१४

७) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: - प्रवेश-२०१४/ प्र. क्र.१९२/ एसडी-२, दि.१४.०५.२०१५

८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उच्चमाध्य-२४२/११ ऑनलाईन/६१३१, दि.२७.१०.२०१५

९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: न्यायाप्र-२०१५/ (६१/१५)/एसडी-२, दि.२८.०३.२०१६

१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: प्रवेश-२०१६/ (प्र. क्र.१८०/१६)/एसडी-२, दि.२७.०१.२०१७

११) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: प्रवेश-२०१८/ प्र.क्र. ३३३/ एसडी-२, दि.०७.०३.२०१९

Scanned with CamScanner

**प्रस्तावना: -**

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ.११ वी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.२८.०५.२००९ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेश मध्ये संदर्भाधीन क्रमांक ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दि.०३.०३.२०१४ च्या शासन पत्रान्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) पुणे आणि पिंपरी-चिंचवड क्षेत्रासोबत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना लागू करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्रमांक १० येथील दि.०७.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

सन २०१८-१९ च्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश, सन २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान आलेले अनुभव, पालकांच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी व त्याअनुषंगाने शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त अहवाल इ. विचारात घेऊन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये आधिक सुसूत्रता आणण्यासाठी सदर्भाधीन क्र. ११ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेदरम्यान आलेले अनुभव व त्याअनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त अहवाल तसेच राज्यात सध्या कोवीड- १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली असामान्य परिस्थिती विचारात घेता सन २०२०- २१ या शैक्षणिक वर्षापासून इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

**शासन निर्णय: -**

मुंबई-ठाणे आणि रायगड जिल्हयातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA), पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिका या महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वीचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षापासून खालीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी:-

**१) आरक्षणासंदर्भात तरतुदी:-**

१.१) सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता (एस ई बी सी) असलेल्या आरक्षणामध्ये १६% ऐवजी १२% असा बदल करण्यात येत आहे.

१.२) अपंग/ दिव्यांगांसाठी असलेले आरक्षण ३% वरुन ४% करण्यात येत आहे.

याव्यतिरिक्त, संविधानिक आरक्षण, अल्पसंख्यांकासाठी राखीव कोटा व व्यवस्थापन कोटा इ. साठीच्या राखीव जागांचे प्रमाण शासनाच्या प्रचलित धोरणानूसार तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ११ मधील तरतुदींनुसार राहील.

**२) प्रवेश प्रक्रीयेच्या संदर्भातील तरतुदी:-**

२.१) <u>द्विलक्षी अभ्यासक्रम (Bi- focal) प्रवेश</u>:- द्विलक्षी अभ्यासक्रम (Bi- focal) प्रवेश हे शून्य फेरीमध्ये आयोजित करण्यात येऊ नयेत. सदर प्रवेश नियमित फेरीमध्ये समांतर प्रवेश प्रक्रीया म्हणून करण्यात यावेत. तसेच द्विलक्षी अभ्यासक्रम (Bi- focal) प्रवेशाबाबत सद्यस्थितीत असलेले अन्य नियम लागू राहतील.

२.२) <u>प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य (FCFS) फेरी:-</u> प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य (FCFS) ही फेरी रद्द करण्यात येत आहे व त्याऐवजी आवश्यकतेनुसार अतिरिक्त विशेष फेरीची प्रक्रीया अवलंबिण्यात यावी, जेथे सर्व रिक्त जागा या सर्वसाधारण जागांमध्ये रुपांतरीत करण्यात येतील व आरक्षणाऐवजी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्ता यादीतील गुणांवर आधारीत जागा देण्यात येतील.



Scanned with CamScanner

सदर सुधारणेमुळे दि ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (७.४), परि. क्र. (९.५) व परि. क्र. (११) ऐवजी खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे:-

(७.४) आवश्यकतेनुसार अतिरिक्त विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात यावे.

(९.५) प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश न घेतलेले विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेच्या विशेष फेरीमध्ये होऊ शकतील. तथापि, घेतलेले प्रवेश रद्द केलेले तसेच शाखा/ महाविद्यालय बदल करु इच्छिणारे विद्यार्थी आधीचा प्रवेश रद्द करुन विशेष फेरी- १ व नंतरच्या अतिरिक्त विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ शकतील.

(११) नियमित फेऱ्या संपल्यानंतर १ विशेष फेरीचे आयोजन करण्यात यावे. विशेष फेरी संपल्यानंतर आवश्यकतेनुसार अतिरिक्त विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात यावे. इ. १२ वी प्रवेशासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

२.३) <u>विद्यार्थ्यांची संमती घेण्याबाबत</u>:- विद्यार्थ्यांनी नियमित फेऱ्यांनंतर विशेष फेरीदरम्यान संमती देण्याबाबत तरतूद करण्यात यावी. जे विद्यार्थी प्रवेश प्रकीयेमध्ये सहभागी होण्याबाबत निश्चित नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी संमती दिली नाही, तर प्रवेश प्रणालीमध्ये त्यांचे अर्ज "जैसे थे" ठेवण्याची सुविधा करण्यात यावी व सदर फेरीमध्ये त्यांना संधी उपलब्ध असणार नाही. तथापि, त्यांना पुढील फेरीत संमतीच्या अटीच्या अधीन राहून सहभाग घेण्याची संधी असेल.

२.४) <u>माहिती पुस्तिका:-</u> कोवीड- १९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे, विद्यार्थ्यांना छापील माहिती पुस्तिका न देता डिजिटल स्वरुपात माहिती पुस्तिका देण्यात यावी. सदर माहिती पुस्तिका पीडीएफ बुकलेट स्वरुपात, ऑनलाईन प्रणालीवर तसेच मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, शाळा/ महाविद्यालयांनी माहिती पुस्तिकेच्या कमीत कमी ५ प्रती (print outs) शाळा/ महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांकरिता सुलभ संदर्भासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच, संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी मार्गदर्शन केंद्रावर माहिती पुस्तिकेच्या कमीत कमी ५ प्रती (print outs) उपलब्ध करुन द्याव्यात.



Scanned with CamScanner

२.५) <u>प्रवेश प्रक्रीया शुल्क:-</u> राज्यात कोवीड- १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रार्दुभावामुळे उद्‌भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रीया शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. याअनुषंगाने प्रवेश प्रक्रीया प्रणालीमध्ये आवश्यक तरतुद करण्यात यावी.

२.६) <u>ऑनलाईन प्रणालीमध्ये आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याबाबत:-</u> ऑनलाईन प्रणालीमध्ये आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची तरतूद करण्यात यावी, जसे की, महाराष्ट्र माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा व्यतिरीक्त अन्य मंडळांचे माध्यमिक शालांत परीक्षा गुणपत्रिका, आरक्षणाचा दावा केला असल्यास त्यासंबधी आवश्यक प्रमाणपत्र. ज्यामुळे सदर कागपत्रांची शाळा/ मार्गदर्शन केंद्रांकडून पडताळणी प्रक्रीयेदरम्यान पडताळणी करता येईल.

३) **बृहन्मुंबई व पुणे मनपा संचलित कनिष्ठ महाविद्यालयांतील विशेष कोटा:-** पुणे महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील ५० टक्के जागा इन- हाऊस कोटा अंतर्गत, पुणे मनपा/ बृहन्मुंबई मनपा यांच्या माध्यमिक शाळांमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. सदर जागा राखीव ठेवण्याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या स्तरावरुन सशर्त परवानगी देण्यात यावी. यासाठी शिक्षण संचालक यांनी विद्यार्थ्यांना होणारे लाभ, स्थानिक परिस्थिती, इत्यादी बाबी विचारात घेऊन, त्यांची तपासणी करुन तात्पुरती मान्यता द्यावी.

प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया व ऑनलाईन प्रवेश प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याच्या अनुषंगाने संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४) प्रस्तुत सुधारणांव्यतिरिक्त शासन निर्णय दिनांक २८.०३.२०१६ व शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ मधील तरतुदी कायम राहतील. तसेच इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत यापुर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या तरतुदी सदर शासन निर्णयातील तरतुदीशी विसंगत असतील त्या तरतुदी सदर शासन निर्णयाव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.



Scanned with CamScanner

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२००६२३१८४०३६७४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2020.06.23 18:48:21 +05'30'

(राजेंद्र पवार)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत: -**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
८) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१०) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद.
११) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभाग/ पुणे विभाग
१२) शिक्षणधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे/रायगड/पुणे/ नागपूर/ अमरावती/ नाशिक/ औरंगाबाद.
१३) शिक्षण निरिक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
१४) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई/पुणे
१५) संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महसंचनालय, मंत्रालय, मुंबई
  - यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयास सर्व प्रसिध्दी माध्यमांव्दारे प्रसिध्दी द्यावी.
१७) निवड नस्ती/एसडी-२



Scanned with CamScanner